महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबईतील मिठी नदीचा विकास करुन पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव

(१) ९७९५ (०७-०४-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठी नदीचा विकास करुन पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावावर केव्हापर्यंत अंमलबजावणी होणार आहे,

(३) असल्यास, मिठी नदीच्या भोवतालीच्या झोपडया हटविण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०१८) : (१), (२), (३) व (४) अशंत: खरे आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीतील मिठी नदीच्या ६.० कि.मी. लांबी व वाकोला नाल्याच्या १.८ कि.मी. लांबीमध्ये करावयाच्या विकास कामांची विभागणी दोन टप्प्यांमध्ये केली असून सदर कामांमध्ये रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत, सेवारस्ते व सुशोभिकरण इ. कामांचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी टप्पा-१ मध्ये मिठी नदीचे सरासरी रुंदीकरण ३०.० मी. व वाकोला नाल्याचे सरासरी रुंदीकरण १०.० मी. एवढे करण्यात आले आहे. त्यामुळे नदीची जलवहन क्षमता आणि जलधारण क्षमता १.५ पटीने वाढली असल्यामुळे पाण्याचा निचरा जलद होऊन प्रदुषण कमी झाल्याने पर्यावरणामध्ये सुधारणा झाली आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मिठी नदी व वाकोला नाल्याचे रुंदीकरण टप्पा-१ मध्ये २६०० झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले असून टप्पा-२ च्या कामामध्ये खोलीकरण, रुंदीकरण व संरक्षक भिंत व सेवा रस्त्याच्या कामाकरीता आजपावेतो ११२८ झोपड्या निष्कासित करण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत वाकोला नाला, वाल्मिकी नगर येथील २६ झोपडयांचे निष्कासन बाकी आहे. मिठी नदीवरील ३४१ झोपड्यांचे परिघखाडी,

कुर्ला, एल.बी.एस. मार्गाच्या बाजूला सेवा रस्त्यासाठी निष्कासित करणे बाकी आहे. सदर झोपड्यांचे निष्कासनाचे काम राष्ट्रीय हरीत लवादाच्या अंतिम निर्णयानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्याचे नियोजित आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत

(२) ३४८२० (२१-०१-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (रजि. सातारा) ने केलेल्या करोडो रुपयांच्या गैरव्यवहाराची सीआयडीकडून चौकशी करून न्यासाची नोंदणी रद्द करणे, न्यासाचे सर्व विश्वस्तांवर फौजदारी गुन्हे दाखल करून दंडात्मक कारवाई करण्यासंदर्भात मा. पर्यावरणमंत्री यांनी त्यांच्या दिनांक १२ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या पत्राव्दारे मा. मुख्यमंत्री यांना विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१८) : (१) व (२) सदर प्रकरणी महाराष्ट्र अंध्दश्रध्दा निर्मुलन समितीने विदेशातून बेकादेशिररित्या लाखो रुपये मिळविल्याप्रकरणी फॉरेन कॉन्ट्रीब्युशन रेग्युलेशन ॲक्ट, २०१० नुसार समितीचा न्यास आणि सर्व विश्वस्त यांच्यावर गुन्हे दाखल करण्याबाबत मा. पर्यावरण मंत्री महोदयांनी निवेदन दिले होते. सदरचे निवेदन उचित कार्यवाहीसाठी पोलीस महासंचालक कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहे.

या प्रकरणी अंधश्रध्दा निर्मुलन समिती न्यासाचे महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम ३३(४) मधील तरतूदी नुसार विशेष लेखा परिक्षण करण्याकरिता अहवाल धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच, या प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. १४२७७/२०१६ दाखल करण्यात आली असून, या मध्ये बदल अर्ज क्र. ३७८/२०१२ मधील एका आदेशाविरुद्ध अपिल दाखल असून, यामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश पारित केले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ऑनलाईन लॉटरीबाबत आलेल्या तक्रारीबाबत

(३) ४८२६४ (२३-०५-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत ५ महिन्यात ऑनलाईन लॉटरीच्या विरोधात अल्पबचत व लॉटरी विभागाकडे ७ ते ८ तक्रारी प्राप्त झाल्याने पुढील कारवाईकरिता पोलीस महासंचालकांकडे वर्ग करण्यात आल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परराज्यातील ऑनलाईन लॉटरी चालविणाऱ्या कंपन्यांनी रेकॉर्डवर दाखविलेले नाव व पत्ते अस्तित्वात नसल्याचेही आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

ऑनलाईन लॉटरी विरोधात महाराष्ट्र राज्य लॉटरी अभिकर्ता सेना, मुंबई व महाराष्ट्र नवनिर्माण लॉटरी विक्रेता सेना, मुंबई यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्राप्त निवेदने पुढील कार्यवाहीसाठी पोलीस महासंचालक यांच्याकडे पाठविण्यात आली आहेत.
(२) व (३) परराज्यातील ऑनलाईन लॉटरी चालविणाऱ्या कंपन्यांनी रेकॉर्डवर दाखविलेले नाव व पत्ते अस्तित्वात नसल्याचे आढळून आले नाही. तथापि, ऑनलाईन तक्रारीच्या अनुषंगाने विविध जिल्ह्यात विशेष मोहिम राबवून अनधिकृत लॉटरीबाबत कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार भंडारा चंद्रपूर, औरंगाबाद व वर्धा जिल्ह्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विविध गुन्ह्यांमध्ये आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुलगाव (जि. वर्धा) केंद्रीय दारुगोळा भांडाराच्या डेल्टा सब डेपोत भीषण स्फोट झाल्याबाबत

(४) ५६०६४ (२३-०८-२०१६). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुलगाव (जि. वर्धा) केंद्रीय दारुगोळा भांडारच्या डेल्टा सब डेपोत भीषण स्फोट होऊन १८ जण ठार तर १७ जण जखमी झाल्याचे दिनांक ३१ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्फोटामुळे पुलगावंच्या परिसरातील अनेक गावातील घरांना मोठ्या प्रमाणात हादरे बसून नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच या घटनेत मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबियांना व जखमींना तसेच ज्यांच्या घरांची पडझड झाली आहे त्यांना घरांचे पंचनामे करुन आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१८) : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

वर्धा जिल्ह्यांतर्गत मौजा आगरगाव, पिपरी, नागझरी या ३ गावांमध्ये एकूण ६२१ अंशत: कच्चा व पक्क्या घरांचे नुकसान झालेले असून बाधीत कुटुंबीयांना माहे मार्च, २०१७ मध्ये रु. २७,१५,२००/- इतके अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. सदर घटनेत १९ व्यक्ती मृत तर १७ जण जखमी झालेले असून मा. मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना रु. ५.०० लक्ष (प्रति व्यक्ती) व जखमी व्यक्तींना रु.१.०० लक्ष (प्रति व्यक्ती) प्रमाणे आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सांगली येथील वसंतदादा बँकेमध्ये महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपये अडकल्याबाबत

(५) ७००८० (२७-०१-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील वसंतदादा बँकेमध्ये सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपये अडकले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये महानगरपालिकेच्या कोणकोणत्या विभागाचा व एकूण किती निधी आहे,

(३) असल्यास, या निधीची व्याजासह एकूण किती कोटी रक्कम होत आहे,

(४) असल्यास, संबंधीत अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी या रक्कमा बेकायदेशीरपणे बँकेत ठेवल्या त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार वा येत आहे,

(५) तसेच ही रक्कम वसुल करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०१-२०१८) : (१), (२) व (३) वसंतदादा शेतकरी सहकारी बँक, सांगली ही बँक रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया च्या दिनांक ०६/०१/२००९ रोजीच्या आदेशान्वये अवसायनात घेण्यात आली. त्यावेळी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची व्याजासह रु. ३३,६०,४८,६५४/- इतकी रक्कम वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेकडे थकित आहे.

(४) या प्रकरणी संबंधित तत्कालीन मुख्य लेखापाल यांना निलंबीत करुन त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे, तसेच तत्कालीन आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका यांना सदर प्रकरणी ताकीद देण्यात आलेली आहे.
(५) सदर बँकेवर अवसायक मंडळ नेमले असून थकीत रक्कम मिळविण्याबाबत महानगरपालिकेमार्फत त्यांच्याकडे पाठपुरावा सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल येथील घरांची म्हाडामार्फत काढण्यात आलेल्या लॉटरीला गिरणी कामगारांनी विरोध दर्शविला असल्याबाबत

(६) ७९४०८ (२१-०४-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) पनवेल येथे बांधलेल्या घरांची लॉटरी म्हाडामार्फत काढण्यात आली असून या घरांना विजेत्या २२ गिरण्या कामगारांनी विरोध दर्शविला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पार्श्वभुमीवर कामगारांना मुंबईत घरे मिळावीत, कामगारांनी म्हाडाकडे केलेल्या अर्जाची छाननी करावी या प्रमुख मागण्यांसाठी गिरणी कामगार एकजूट संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन गिरणी कामगारांच्या सदर मागण्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२३-०२-२०१८) : (१) व (२) म्हाडाकडून ज्या गिरण्यांच्या सोडत झालेल्या आहेत त्या सोडतीमधील यशस्वी गिरणी कामगारांना वगळून इतर गिरणी कामगारांकरिता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) मार्फत पनवेल येथे बांधलेल्या २४१७ (दोन युनिट एकत्र करुन) घरांची सोडत दि. ०२.१२.२०१६ रोजी काढण्यात आली. सदरहू सोडतीत यशस्वी ठरलेल्या अर्जदारांपैकी २२ गिरणी कामगारांनी सदर सोडतीस विरोध दर्शविला आहे, असे म्हाडाने शासनास कळविले आहे.
(३) एम.एम.आर.डी.ए. कडे उपलब्ध असलेल्या सदनिका या कोणत्याही गिरणीच्या जमिनीशी संबधित नसल्याने यापुर्वी सदनिकांचे वितरण केलेल्या गिरणी कामगाराना वगळून इतर गिरणी कामगारांकरिता सदर सदनिकांची सोडत काढण्याचा निर्णय गिरणी कामगार संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत झालेल्या बैठकीत दि. २.३.२०१६ रोजी घेण्यात आला होता व त्यानुसार कोनगाव, पनवेल येथील सोडत काढण्यात आली.त्याच प्रमाणे, मा.मुख्य सचिव यांच्याकडे दि. ३१.७.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत ज्या गिरण्यांची जागा म्हाडाला प्राप्त

झालेली आहे, परंतु त्या गिरण्यांच्या जागेवरील सदनिकांची अद्यापपर्यंत सोडत झालेली नाही, अशा गिरणी कामगारांना एम.एम.आर.डी.ए.च्या सोडतीतून वगळण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग किल्ले प्रेरणोत्सवनिमित्त जिल्ह्यातील सर्व वर्तमानपत्रामध्ये 'सत्यमेव जयते' या राष्ट्रीय चिन्हांचा दुरूपयोग केल्याबाबत

(७) ८४८५९ (०४-०९-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'द स्टेट एम्ब्लेम ॲक्ट, २००५' नुसार राष्ट्रीय प्रतीक सत्यमेव जयतेचा व्यावसायिक कारणासाठी वापर करणे हा गुन्हा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग किल्ले प्रेरणोत्सवानिमित्त दिनांक २२ एप्रिल, २०१६ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व वर्तमानपत्रामध्ये 'सत्यमेव जयते' या चिन्हासोबत व्यावसायिक कारणांसाठी काहींनी आक्षेपार्ह जाहिरात प्रसिध्द केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गुन्हासंदर्भात संबंधित दोषींविरोधात 'द स्टेट एम्ब्लेम ॲक्ट, २००५' च्या कलम ३ व कलम ४ अन्वये गुन्हे दाखल करण्यात यावे अशा मागणीचे एक निवेदन जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना दिनांक ३ ऑक्टोबर, २०१६ रोजी कस्तुरी मृग फांऊडेशनतर्फे सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरोधात अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, 'द स्टेट एम्ब्लेम ॲक्ट, २००५' नुसार राष्ट्रीय प्रतिक 'सत्यमेव जयते'चा व्यावसायिक कारणांसाठी वापर करणाऱ्या सदरहू दोषींविरोधात कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१८) : (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

सदरहू प्रकरणी निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन जवाब घेण्यात आलेले आहेत.

(५) सदरची जाहिरात ही कोणी दिली व कशाप्रकारे दिली याबाबतची माहिती मिळणेकरिता पोलीसांकडून सिंधुदूर्ग जिल्ह्यातील स्थानिक वृत्तपत्रांचे संपादक यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरण हे चौकशीवर प्रलंबित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

बेलापूर (जि.ठाणे) या ऐतिहासिक किल्ल्याच्या सुशोभिकरणाबाबत.

(८) ८५२९८ (२१-०८-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलापूर (जि.ठाणे) या ऐतिहासिक किल्ल्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त किल्ल्याच्या सुशोभिकरणाकरिता रूपये ११ कोटी पर्यंत खर्च करण्यात येऊन उक्त काम सन २०१७ पर्यंत पूर्ण करण्याची घोषणा सन २०१५ मध्ये सिडकोने करूनही अद्यापी कोणत्याही स्वरूपाचे काम सुरु करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार किल्ल्याच्या सुशोभिकरणाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व काम प्रत्यक्षात कधी सुरु करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१८) : (१), (२) व (३) होय.

बेलापूर किल्ल्याच्या सुशोभीकरणाकरीता सिडको संचालक मंडळाने ठराव क्र. ११४९७, दिनांक १.१२.२०१५ रोजी दिलेल्या तत्वत: मान्यतेनुसार मे.किमया, पुणे व मे.स्ट्रक्टवेल, नवी मुंबई या सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली होती. तद्नंतर मे.किमया यांनी दिनांक २७.७.२०१७ रोजी सादर केलेल्या रु. १६,५८,८८,६१३/- इतक्या सुधारीत रकमेच्या अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यासंदर्भात ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे. सदर कामाची प्रत्यक्ष सुरुवात मार्च, २०१८ मध्ये होणे अपेक्षित असून काम पूर्ण होण्याचा कालावधी २४ महिने आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

दुर्गादेवी रहिवाशी संघ बी.डी.डी. चाळ क्र. २७,२८ व २९ समोरील वसाहतीतील २६ झोपडपट्टीधारकांना बी.डी.डी. चाळ पुनर्विकास योजनेत समाविष्ट करून घेण्याबाबत

(९) ८५४४८ (०१-०९-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुर्गादेवी रहिवाशी संघ बी.डी.डी. चाळ क्र. २७, २८ व २९ समोरील वसाहतीतील २६ झोपडपट्टीधारकांना बी.डी.डी. चाळ पुनर्विकास योजनेत समाविष्ट करून घेण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मा. गृहनिर्माण मंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने झोपडपट्टीधारकांना बी.डी.डी. चाळ पुनर्वसन योजनेत समाविष्ट करून घेण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२६-०२-२०१८) : (१) होय. हे खरे आहे.
(२) दुर्गादेवी रहिवाशी संघ झोपडपट्टी, वरळी येथील म्हाडाच्या ताब्यात असलेल्या बी.डी.डी. चाळींच्या भूखंडाच्या हद्दीबाहेर आहे. त्यामुळे सदर झोपडपट्टीचा समावेश बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पामध्ये करणेबाबत कार्यवाही करता येणार नाही, असे मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी कळविलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रात प्रस्तावित मलनिःसारण योजनेचे निविदा प्रक्रीयेतील अटी शिथिल करण्याबाबत

(१०) ८८७७९ (२३-०८-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासन पुरस्कृत 'अमृत अभियानांतर्गत' उल्हासनगर महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रात प्रस्तावित मलनिःसारण योजना टप्पा क्र. १ या मधील टंक - मेन टाकणे व मलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाच्या ७१,९०,४०,२७६ रू/- किंमतीच्या निविदा दिनांक ७ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास मागविण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रीया कठोर अटीमुळे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निविदा प्रक्रियेतील अटी शिथिल करून कामास गती देण्याबाबत शासनस्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१८) : (१) होय.
(२), (३) व (४) • या प्रकल्पाच्या निविदेप्रक्रियेअंती प्रकल्पाच्या कामाचे कार्यादेश दि.११.१२.२०१७ रोजी देण्यात आले असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

राज्यात संचित व अभिवचन रजेवरील ६७३ कैदी फरार असल्याबाबत

(११) ९०१८६ (०४-०९-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गत २० वर्षात संचित व अभिवचन रजेवर असतांना पळून गेलेल्यापैंकी सुमारे ६७३ कैदी अद्याप फरार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या फरारी कैद्यांना पकडण्याकरिता पोलीस प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, आतापर्यंत किती कैद्यांना पकडण्यात आले आहे व याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१८) : (१) अशंत: खरे आहे.

दि. ३१.०५.२०१७ पर्यत ६६२ बंदी संचित व अभिवचन रजेवरुन फरार आहेत.

(२) फरार बंदी पुन्हा कारागृहात दाखल करणेकरिता त्यांचेविरुध्द दि. १९.०७.२०१३ पासून भा.द.वि कलम २२४ अंतर्गत गुन्हा दाखल करणेची कार्यवाही तसेच सन २०१६ पासून फरार बंद्याचे, छायाचित्रे/माहिती स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द केली आहे. तसेच पोलीस व कारागृह विभागाचे संकेतस्थळावर फरार बंद्याबाबत माहिती प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) संचित व अभिवचन रजेवरुन फरार झालेल्या बंदयापैकी माहे जून, २०१३ पासून दि.३१.०५.२०१७ अखेर १८२ बंदयांना अटक करुन पुन्हा कारागृहात दाखल केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेत ६२ वाहन चालक कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आल्याबाबत

(१२) ९०५५७ (२३-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेसाठी ६२ वाहन चालक कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आले व त्यांच्या नियुक्तीला सक्षम आधिकाऱ्यांची परवानगी घेण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या ६२ वाहन चालकांचे वेतन सक्षम आधिकाऱ्यांची परवानगी न घेता काढण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सबंधित कर्मचारी व आधिकारी यांच्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१७) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदर ६२ कंत्राटी वाहन चालकांचे वेतन सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेने अदा करण्यात आलेले आहे.

(३) • जिल्हा नियोजन समितीकडून महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागासाठी तीन चाकी टेम्पो खरेदी करण्या करिता निधी उपलब्ध झाल्यानुसार ६२ तीन चाकी टेम्पो प्राप्त झाले.

• सदर वाहनावरील कंत्राटी वाहनचालक पुरविण्यासंदर्भात निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

• निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कार्यरत एजन्सीकडून खाजगी वाहन चालकांचा पुरवठा करण्यास स्थायी समितीने दि.२७.९.२०१६ रोजी मान्यता दिली.

• स्थायी समितीच्या मान्यतेने खाजगी वाहन चालक पुरविण्याबाबत संबंधित कंत्राटदारास कळविलेले आहे.

• खाजगी वाहन चालकांचा पुरवठा केल्याबाबत महानगरपालिका आयुक्त यांची कार्योत्तर मंजुरी घेण्यात आली.

• या प्रकरणी कामगार अधिकारी व लेखाधिकारी यांचे खुलासे घेण्यात आलेले असून त्यानुसार पुढील कार्यवाही औरंगाबाद महानगरपालिका करीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथे JNNRS अंतर्गत पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत असल्याबाबत

(१३) ९२७७७ (२३-०८-२०१७). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवलीमध्ये (जि.ठाणे) केंद्र आणि राज्य शासनाच्या अनुदानातून JNNRS अंतर्गत पाणीपुरवठा योजना राबिवताना जलवाहिन्यांवर १०० % मिटर लावणे बंधनकारक असतांना चेतस कंपनीने रु.३.०० कोटी खर्चून अवघे १५००० मीटर लावून शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने पाणी योजना, ड्रेनेज रस्ते यासाठी कोट्यवधी निधी दिला मात्र त्याचा योग्य विनयोग केला नसून तांत्रिकदृष्ट्या कामे योग्य झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील लोकांचे बुस्टर पंपामुळे शॉक लागून मृत्युमुखी पडल्याच्याही घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नेतिवली येथून डोंबिवलीला पाणीपुरवठा करण्यासाठी टाकण्यात आलेल्या जलवाहिन्यांची जागा ऐनवेळी बदलण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चाकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी आढळलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१८) : (१) • कल्याण-डोंबिवलीमध्ये (जि.ठाणे) केंद्र आणि राज्य शासनाच्या अनुदानातून JNNURM अंतर्गत पाणीपुरवठा योजना राबिवताना जलवाहिन्यांवर १०० % जलमापक बसवणे बंधनकारक होते.
• सदर काम चेतस कंपनीला देण्यात आले असून कपंनीने ७६,०८० जलमापकांचा पुरवठा करुन ती बसविणे आवश्यक होते.
• त्यानुसार, सदर कपंनीने ७६,०८० जलमापंकाचा पुरवठा केला आहे.
• त्यापैकी ६७,७०७ जलमापके बसविण्यात आली असून उर्वरित जलमापके बसविण्याचे काम चालू आहे.
(२) कामे तांत्रिक निकषानुसार करण्यात आली असून प्राप्त निधीचा पुर्ण विनियोग करण्यात आला असल्याचे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) सदर बाब वस्तुस्थितीवर आधारित नसल्याचा अहवाल कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने सादर केला आहे.

(४) होय, तांत्रिक अडचणीमुळे जलवाहिनीची जागा रस्त्याच्या उजव्या बाजूस बदलण्यात आली असल्याचे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

येरवडा मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या मुस्लिम कैद्यांना रमजान महिन्यात आहार पुरवठा करण्यास परवानगी मिळणेबाबत

(१४) ९२८३१ (०४-०९-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येरवडा मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या मुस्लिम कैद्यांना रमजान महिन्यात पौष्टिक आहाराचा पुरवठा करण्यास काही सामाजिक संस्थाना परवानगी मिळणेबाबतचे निवेदन मा.लोकप्रतीनिधिंनी दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहाटे ४ ते ५ च्या सुमारास सकाळी आहार पुरवठा करण्याची सोय नसल्याने मुस्लीम कैद्यांना रात्री दिलेले अन्न वाचवून ते खावूनच उपवास धारवा लागत असल्याने काही सामाजिक संस्थांनी या कैद्यांना लागणारा पौष्टिक अन्न पुरवठा करण्याची तयारी दर्शवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सामाजिक संस्थाना परवानगी देणेबाबत शासनाची भुमीका काय आहे व त्यानुसार कैद्यांना कारागृह प्रशासनाच्या वतीने रमजानच्या महिन्यात वेळेवर पौष्टिक अन्न पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१८) : (१) (२) व (३) हे खरे नाही.

कारागृहात रमजानच्या महिन्यामध्ये मुस्लीम बंद्यांना विशेष बाब म्हणून पहाटेच्यावेळी कारागृह नियमानुसार देण्यात येणारा आहार, चहा, नाष्टा, दूध, केळी, चपाती, भाजी व डाळ इ. पुरविले जाते. बंद्यांना जेवणाव्यतिरिक्त महाराष्ट्र कारागृह नियमावली मधील तरतूदीनुसार ना-नफा-ना-तोटा या तत्वावर कारागृमध्ये बंद्याकरीता उपहारगृह चालविण्यात येते. त्याद्वारे बंद्याकरीता दैनंदिन वापराच्या वस्तु कारागृह उपगृहामध्ये विक्रीसाठी ठेवण्यात येतात. (ताजी फळे, खजूर, सुका मेवा, दूध, अंडी व ईदच्या दिवशी चिकन व शिरखुर्मा) त्याकरीता, बंद्यांना प्रतिमहा रु. ३५००/- पर्यंत मर्यादा ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे, रमजान महिन्यात बंद्याकरीता पौष्टिक अन्न पुरवठा करण्याबाबत सामाजिक संस्थांना परवानगी देण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड वाघाळा महानगरपालिका हद्दीतील कचरा साफसफाई व संकलन करणाऱ्या कंत्राटदाराची मुदत संपल्याबाबत

(१५) ९३३८० (२३-०८-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड वाघाळा महानगरपालिका हद्दीतील कचरा साफसफाई व संकलनाच्या कंत्राटदाराची मुदत संपण्यापूर्वी तत्कालीन आयुक्तांनी त्याबाबतचे नियोजन केले नसल्याची बाब महापौर यांनी दिनांक ३ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिव यांना दिलेल्या निवेदनातून निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित आयुक्तांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१८) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छतेच्या कामी दिरंगाई करणारे तत्कालीन महानगरपालिका आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या विरुध्द कारवाई करण्याचे निवेदन महापौर, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी दि.१३.६.२०१७ रोजी प्रधान सचिव (नवि-२) यांना दिलेले आहे.

महानगरपालिका हद्यीतील संपूर्ण घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाची मुदत दि.३१.३.२०१७ रोजी समाप्त होत असल्यामुळे तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांनी या कामासाठी दि.२९.१२.२०१६ रोजी निविदा प्रसिध्द केलेल्या होत्या. तथापि, ४ वेळा मुदतवाढ देऊनही प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदर कामासाठी दि.१.९.२०१७ रोजी फेरनिविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी रक्कमेची निविदा असलेल्या आर. बी. इन्फ्रा. प्रोजेक्ट प्रा. लि. मुंबई यांना दि.१५.२.२०१८ रोजी महानगरपालीकेने कार्यारंभ आदेश दिले व त्यानुसार संबंधित कंत्राटदाराने दि.२१.२.२०१८ पासून काम सुरू केले आहे.

(३) प्रश्न उद्वभवत नाही.

नागरी कमाल जमीन धारणा अंतर्गत शासनास प्राप्त झालेल्या जमिनी मुळ मालकाच्याच नावावर असल्याबाबत

(१६) ९५०१२ (०६-०१-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरी कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत किती उद्योगपतींच्या अतिरिक्त जमीनी शासनाने ताब्यात घेतल्या आहेत आणि किती जमीनींचा ताबा अद्याप घ्यावयाचा बाकी आहे तसेच भूमिहिनासाठी घरे बांधण्याच्या उद्देशाने अस्तित्वात आलेला नागरी कमाल जमीन धारणा कायदा सन २००७ मध्ये रद्द करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे आणि मुंबईतील किती उद्योगपतींकडे व कार्पोरेट कंपन्यांकडे अतिरिक्त जमीनींचा ताबा आहे व उक्त कायदा रद्द होण्यापूर्वी या कायद्याअंतर्गत ज्या जमीनी शासनाने ताब्यात घेतल्या त्या जमिनी तात्काळ शासनाच्या नावावर करणे आवश्यक असताना संबंधित जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी कार्यालयाने पंचनामे करुन सदर जमिनीचे ताबापत्र शासनाच्या नावे केले नसल्याने सुमारे १० हजार कोटी रुपये जमीन गमावण्याचा धोका निर्माण झाल्याची धक्कादायक माहिती माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाच्या ताब्यात आलेली हजारो हेक्टर जमीन पुन्हा मूळ मालकांच्या ताब्यात जाणार तसेच प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे एमएमआरडीएला १०० कोटी रुपये किंमतीच्या जमिनीस मुकावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार नागरी कमाल जमीन धारणा कायद्याअंतर्गत प्राप्त झालेली जमीन शासनाच्या नावे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर जमिनी शासनाच्या नावे करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१८) : (१), (२), (३) व (४) तत्कालीन परिस्थितीमध्ये नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ मधील कलम ६(१) नुसार जमीनधारकांनी सादर केलेल्या विवरणपत्राच्या आधारे कलम ८(४) नुसार जमीन अतिरीक्त घोषित करण्यात येत होती. सदर अतिरीक्त घोषित करण्यात आलेल्या जमिनीबाबत कलम १०(३) व १०(५) नुसार कार्यवाही करून ताबा घेण्यात येत होता किंवा जमिनधारकाच्या विनंतीनुसार अतिरीक्त मोकळ्या क्षेत्रावर कलम २० अन्वये काही अटी व शर्तीसह गृहबांधणी, भुखंड विकास, कृषी व औद्योगिक प्रयोजनार्थ सुट देण्यात आली आहे.

उक्त अधिनियम केंद्र शासनाने नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ अन्वये दि. २२ मार्च, १९९९ रोजी निरसित केला. सदर निरसन अधिनियम राज्य शासनाने दिनांक ३०/११/२००७ रोजी पासून स्विकृत केला आहे.

मूळ नाजकधा अधिनियमातील कलम १०(३) व १०(५) नुसार कार्यवाही करुन जमीन संपादनाची कार्यवाही करण्यात आली आहे. परंतू, जमिनधारकांच्या विनंतीनुसार नाजकधा कलम २० अन्वये गृहबांधणी, प्रयोजनार्थ सुट देण्यात आलेल्या जमिनींचा सूटीच्या आदेशातील अटी व शर्तीनुसार विकास करणे योजनाधारकांवर बंधनकारक असल्याने सदर जमिनींचा ताबा घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच सदर सूट दिलेल्या जमिनींच्या मिळकत पत्रिकेवर सूटीच्या आदेशाच्या नोंदी घेण्यात आल्या असून, अशा जमिनी शासनाच्या पुर्वपरवानगीशिवाय हस्तांतरणास बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे शासनाचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक महानगरपालिकेतील महिला बालकल्याण विभागास पुरेसा निधी मिळण्याबाबत

(१७) ९५०४४ (३०-१२-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या महिला बालकल्याण विभागासाठी १३.२४ कोटीचा निधी प्राप्त झाला असता केवळ ५० लाख रुपयांचा निधी शिल्लक असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीस आवश्यक तो निधी उपलब्ध करुन न दिल्याबाबत वाशिम महानगरपालिका आयुक्तांकडे माहे ऑक्टोबर, २०१७ च्या शेवटच्या आठवडयात महिला व बालकल्याण समितीच्या सभापतींनी तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार महिला बालकल्याण विभागासाठी प्राप्त झालेला निधी परस्पर हस्तांतर करण्याऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, नाशिक महानगरपालिकेतील विकास कामे पूर्ण क्षमतेने व्हावीत म्हणून नाशिक महिला बालकल्याण विभागास पुरेसा निधी मिळावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१८) : (१) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण विभागासाठी सन २०१७-१८ मध्ये रु.१३.२४ कोटी निधी मंजुर करण्यात आला आहे.

त्यापैकी माहे सप्टेंबर, २०१७ अखेर रु.९७.५२ लाख इतका खर्च झाला असून, रु.१२.२७ कोटी इतका निधी शिल्लक होता.
(२) नाशिक महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागास मंजुर करण्यात आलेल्या निधीतून समितीची परवानगी न घेता अन्य कामांवर खर्च करण्यात येत असल्याबाबत, तसेच सदर निधी पुर्नसंचयित करण्याबाबत व तरतुदीत वाढ करण्याबाबत महिला व बालकल्याण समितीच्या सभापतींनी महानगरपालिकेकडे तक्रार केली होती.

(३) व (४) प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने निधीबाबत महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात आलेली असून, चूकीचा वर्गीकरण झालेला निधी पुर्नस्थापित करण्यात आलेला आहे. तसेच महानगरपालिकेने महिला बालकल्याण विभागास विकास कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

लातूर इंडस्ट्रीयल इस्टेट को.ऑप.सोसायटी मधील बांधकाम परवाना मिळवितांना भूखंडधारकांनी हस्तांतरणास दिलेली परवानगी उदयोग संचालनालयाने रद्द केल्याबाबत

(१८) ९५१०४ (०३-०१-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर इंडस्ट्रीयल इस्टेट को.ऑप.सोसायटी मधील भूखंड क्र. ५६, ५७, ६२ व ६३ यांना दिलेला बांधकाम परवाना क्र. ९५ नुसार दिनांक २० मे, २०१४ रोजी दिला असून, सदरील भूखंडाच्या हस्तांरणास व एकत्रीकरणास मान्यता उद्योग संचालनालयाकडून मिळाली नसल्याने सदर दिलेला बांधकाम परवाना लातूर महानगरपालिकेचे पत्र क्र. ३९५२ दिनांक ११ मे, २०१५ अन्वये रद्द करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंडाधारकांनी पुन्हा दिनांक २१ जून, २०१७ रोजी बांधकाम परवाना मिळण्यासाठी लातूर महानगरपालिकेकडे अर्ज केला व त्या अर्जामध्ये दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी उद्योग संचालनालयाकडून भूखंड हस्तांतरणास मंजूरी असल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार दिनांक १ सप्टेंबर, २०१७ रोजी आयुक्त, महानगरपालिका लातूर यांनी सदर भूखंडधारकांचा पूर्वी रद्द केलेला बांधकाम परवाना पुन्हा मंजूर करुन त्यास दिनांक २० मे, २०१८ पर्यंत मुदतवाढ दिली असून सदर बांधकाम परवाना मिळवितांना सदर भूखंडधारकांनी हस्तांतरणास दिलेली परवानगी दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ च्या पत्रानुसार उदयोग संचालनालयाने रद्द केली ही बाब आयुक्त महानगरपालिका यांच्यापासून लपवून ठेवण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर भूखंडधारकांनी आयुक्त महानगरपालिका लातूर यांची दिशाभूल करुन बांधकाम परवाना मिळाल्याने त्यांच्यावर कार्यवाही करण्याबाबतची तक्रार दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी महानगरपालिका आयुक्त आणि दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे दाखल झाली आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाच्या मालकीच्या भूखंडाच्या या बेकायदेशीर विक्री व खरेदी प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१८) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

उत्सव उद्योग, लातूर यांनी लातूर शहर महानगरपालिकेने रद्द केलेल्या बांधकाम परवान्याचे नुतनीकरण करण्यासाठी दिलेल्या अर्जावर सुनावणी घेऊन सदर बांधकाम परवान्यास महानगरपालिकेने दिनांक २०.५.२०१८ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

तसेच उद्योग संचालनालय, मुंबई यांनी हस्तांतरण रद्द केलेल्या पत्राची प्रत उत्सव उद्योग, लातूर यांनी बांधकाम परवाना नुतनीकरणाच्या अर्जासोबत महानगरपालिकेस सादर केलेली आहे.

(४) हे खरे आहे.

(५) या प्रकरणी चौकशी करण्याबाबत शासनाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना निदेश दिले होते त्यानुषंगाने या प्रकरणी केलेल्या चौकशीचा अहवाल लातूर महानगरपालिकेने दिनांक २९.१२.२०१७ रोजी चौकशी समितीकडे सादर केलेला आहे.

लातूर शहरातील श्रीनिवास नगर भागातील सर्वे क्र.३२ मधील ले-आऊट मध्ये सुरु असलेले इमारतीचे बांधकाम

(१९) ९५१०६ (०१-०१-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहरातील श्रीनिवास नगर भागातील सर्वे क्र.३२ मधील ले आऊट दिनांक १२ ऑक्टोबर, २००६ रोजी वा त्या सुमारास नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजूर लेआऊटमधील प्लॉट क्र.४५, ४६ आणि ४७, ४८ यामधील असलेल्या ३० फूटी रोडसह सर्वच प्लॉट एकत्रित करुन भूतडा कुटुंबियांनी त्यावर ५ मजली निवासी इमारतीचे बांधकाम चालू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कन्हेरी भागात गट क्र.११/ब/२ मधील मंजूर रेखांकनातील ग्रीन बेल्टवर २ मजली अनधिकृत निवासी इमारतही बांधण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत लातूर महानगरपालिकेकडे दिनांक २८ ऑगस्ट व दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास तक्रार दाखल झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर तक्रारीनुसार लातूर महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) लातूर शहर महानगरपालिकेने दिनांक १०.२.२०१४ रोजी दिलेल्या सुधारित मंजूर रेखांकनानुसार भुखंड क्रमांक. ४३,४४ व ४५,४६ हे चारही भुखंड एकत्र करुन बांधकामास महानगरपालिकेने परवानगी दिलेली असून सद्यस्थितीत बांधकाम सुरु आहे.

(३), (४) व (५) मौजे कन्हेरी येथील सर्व्हे नंबर ११ मधील रेखांकनास नगररचनाकार, लातूर यांनी मंजुरी दिलेली आहे. रेखांकनाच्या पश्चिम भागातील खुल्या जागेत संबंधित शेत

मालकांनी दोन मजली इमारतींचे बांधकाम केलेले आहे. सदरचे बांधकाम हे अनधिकृत असल्यामुळे ते काढून टाकण्याबाबत लातूर शहर महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दि.२३.१.२०१८ रोजी निदेश दिलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांना शिल्लक असलेला भूखंड वितरीत करण्याबाबत

(२०) ९५१३७ (०१-०१-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने नवी मुंबई, उरण व पनवेल येथील जमिन घेताना प्रकल्पग्रस्तांचा विकास केला जाईल असे जाहिर करून ९४ गावांची जमीन शासनाने सक्तीने घेतली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या संपादित केलेल्या जमिंनीच्या मोबदल्यात १२.५ टक्के भूखंड परत करण्याचा निर्णय घेऊनही प्रत्यक्षात प्रकल्पग्रस्तांना ७.८५ टक्के भूखंड सिडकोने वितरीत केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित ३.७५ टक्के भूखंड सामाजिक सुविधेसाठी राखून ठेवल्याचे सिडकोने भासवून एकूण २०३८ एकर जमिंनीपैकी केवळ ३७ एकर जमिन प्रकल्पग्रस्तांना वितरीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उर्वरित शिल्लक भूखंड प्रकल्पग्रस्तांना वितरीत करण्याबाबत शासनस्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१८) : (१) शासनाने दि.२०/३/१९७१ च्या अधिसूचनेन्वये नवी मुंबई प्रकल्पासाठी उरण, पनवेल, ठाणे येथील जमिनी रितसर प्रक्रिया अवलंबून संपादित केल्या आहेत.

(२), (३) व (४) दि.६ मार्च, १९९० च्या शासन निर्णयानुसार संपादित जमिनीपैकी १२.५ टक्के जमिनीचे वाटप प्रकल्पबाधितांना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयानुसार ३० टक्के म्हणजेच ३.७५ टक्के जमिन सोयीसुविधांसाठी राखून ठेवण्यात येवून उर्वरित ८.७५ टक्के जमिन संबंधित खातेदारांना प्रत्यक्ष वाटप करण्यात येते.

१२.५ टक्के योजनेअंतर्गत वाटप करावयाचे एकूण देय क्षेत्र ८७८.२० हेक्टर इतके असून त्यापैकी ७३१.३२ हेक्टर क्षेत्र वाटप करण्यात आले आहे व ७६.११ हेक्टर क्षेत्र इरादित केलेले आहे. तसेच वाटपासाठी ७०.७७ हेक्टर एवढे क्षेत्र शिल्लक असून वाटप प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कारागृहे कैद्यांना अपुरी पडत असल्याबाबत

(२१) ९५३२६ (०६-०१-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ९ मध्यवर्ती, ३१ जिल्हा तुरुंग, १३ खुले तुरूंग तर १७२ उपतुरुंग असून पुणे व मुंबई येथे महिलांकरिता स्वतंत्र तुरुंगे आहेत या तुरुंगांत क्षमतेपेक्षा अधिक कैद्यी ठेवले जात असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कारागृहात १० ते १५ कैद्यांची क्षमता असलेल्या बराकात ३५ ते ४० कैदी ठेवण्यात येत असून या बराकाची दुरावस्था झाली आहे, तडे गेलेल्या भिंती, गळणारे छप्पर, सांडपाण्याचा निचारा होवू न शकल्याने तुंबलेली स्वच्छतागृह त्यामुळे कैद्यांना अनेक संसर्गजन्य रोग जडल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील आधारवाडी कारागृहात क्षमतेपेक्षा तिप्पट कैदी ठेवण्यात आले असून कैद्यांना ठेवण्यात आलेले बराक अतिशय जीर्ण झाले असून स्वच्छतागृहाची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील बाब गंभीर असल्याने याबाबत शासनाने राज्यातील सर्व कारागृहांचे सर्वेक्षण केले आहे काय,

(५) असल्यास, या सर्वेक्षणाचा संपूर्ण तपशील काय आहे, त्यानुसार या कारगृहातील दुरुस्तीकरीता निधीची तरतूद करुन कारागृहाची दुरुस्ती करण्याबाबत तसेच राज्यात आणखी नविन कारागृह उभारण्याबाबत व कैद्यांना आहारासह आवश्यक त्या सोयीसुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१८) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) व (५) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्र.४६/२०१५ सह १६७/१५ च्या अनुषंगाने कारागृहात अद्ययावत सुधारणा करण्यासाठी से.नि. न्यायाधिश डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. राज्यातील कारागृहातील शौचालय/स्नानगृहे यांची दुरुस्ती व नवीन बांधकामे याबाबत आढावा घेण्यात आला असून, त्याकरीता पुरवणी मागणीद्वारे अतिरिक्त २० कोटी इतके अनुदान मंजूर

करण्यात आले आहे. कामाच्या प्रगतीचा आढावा वरिष्ठ पातळीवर वेळोवेळी घेतला जात आहे. राज्यातील कारागृहातील कैद्यांना आहार व अन्य आवश्यक सोयी सुविधेबाबत शासन अधिसूचना दि. २४.०५.२००५ नुसार स्त्री व पुरुष भारतीय व परदेशी न्यायाधीन व सिध्ददोष बंद्यांना आहार दिला जातो. तसेच शासन अधिसूचना दि. ०७.०२.२००७ नुसार ०१ ते ०४ वर्षाच्या मुलांचे आहाराचे सुधारित प्रमाण निश्चित केले आहे. त्याचप्रमाणे लहान मुलांना दिलेल्या परिमाणानुसार आहार दिला जातो. तसेच, कारागृहातील कैद्यांना पुरविण्यात येणाऱ्या आहार व स्वच्छतेबाबत अचानक कारागृहात भेट देऊन, तपासणी करण्याकरीता आहार तज्ज्ञ व समाजसेवक यांची सर्व कारागृहात समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुषंगाने कार्यवाही चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

शहीद जवानांच्या पत्नींना शासकीय सेवेत अनुकंपातत्वावर नोकरी मिळण्याबाबत

(२२) ९५३७७ (३०-१२-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहीद जवानांच्या पत्नी शासकीय सेवेत अनुकंपातत्वावर नोकरी मिळावी यासाठी मागील वर्षभरापासून लढा देत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुपवाडा उरी येथील हल्ल्यात आणि जम्मु काश्मीर मधील हिमस्खलनात शहीद झालेल्या जवानांच्या पत्नींनी शासनाकडे नोकरीसाठी विनंती करुन देखील अद्याप त्यांना नोकरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन शहीद जवानांच्या पत्नींना शासकीय सेवेत अनुकंपातत्वावर सामावुन घेण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१६-०२-२०१८) : (१), (२), (३) व (४) अशी कोणतीही बाब जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नाशिक यांचेकडे अथवा या विभागाकडे प्राप्त झालेली नाही.--

वीरजवान नंबर २७९९२८५W नायक शंकर चंद्रभान शिंदे, रा.भयाळे, ता.चांदवड, जि.नाशिक हे “OP RAKSHAK” कुपवाडा येथे शहीद झालेले आहेत. शहीद जवान शंकर चंद्रभान शिंदे यांच्या वीरपत्नी श्रीमती सुवर्णा शंकर शिंदे यांनी स्टेशन हेडक्वॉर्टर, देवळाली येथे संपन्न झालेल्या वीर पत्नी संमेलनावेळी नोकरी मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे.

सेवारत सैनिक हे सेवेत असतांना केंद्र शासनाच्या अखत्यारित येतात सद्यस्थितीत अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याचा लाभ महाराष्ट्र शासनाद्वारे फक्त राज्य शासनाच्या सेवेत असतांना मृत्यु पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना देण्यात येत आहे.

शहिद जवानांच्या पत्नी/पाल्यांना शासकीय सेवेत अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत शासनाचे धोरण नाही.

तथापि, शहीद सैनिकांबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीए १०८२-३५०२- सीआर १००/ १६- अ, दिनांक २ सप्टेंबर, १९८३ अन्वये युध्द काळात/ किंवा युध्द नसतांना सैनिकी सेवेत मृत झालेल्या माजी सैनिकाच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला (वीरपत्नी किंवा कुटुंबातील इतर अवलंबितांपैकी एक) त्या नंतरच्या पसंती क्रमाने वर्ग ३ व वर्ग ४ मधील १५ टक्के आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदावर नियुक्तीची तरतूद आहे.

ईस्टर्न फ्री वे मार्ग-३ वाढवून घाटकोपर येथील रमाबाईनगरजवळ पूर्व द्रुतगती महामार्गाला जोडण्याबाबत

(२३) ९५४५६ (३०-१२-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरलेला ईस्टर्न फ्री वे मार्ग-३ वाढवून मानखुर्दऐवजी घाटकोपर येथील रमाबाईनगरजवळ पूर्व द्रुतगती महामार्गाला जोडण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०१८) : (१), (२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पूर्व मुक्त मार्गाचे काम ऑरेंज गेट ते घाटकोपर मानखुर्द जोडरस्त्यापर्यंत पूर्ण करण्यात आले असून सदर रस्ता दिनांक ०२.०५.२०१५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आला आहे.

घाटकोपर-मानखुर्द जोडरस्ता ते पूर्व द्रुतगती महामार्गापर्यंतचे रस्त्याच्या आखणीमध्ये अनेक कांदळवन असल्यामुळे व त्या ठिकाणी पक्षी अभयारण्य असल्यामुळे पर्यावरणाची मंजूरी आवश्यक आहे. याशिवाय सदर रस्त्याच्या आखणी मार्गात असलेल्या अतिक्रमणामुळे झोपडपट्टयांचे पुनर्वसन करणेही आवश्यक आहे. त्यानुषंगाने आखणीत बाधीत होणाऱ्या झोपड्याच्या सर्वेक्षणाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे.

मुंबईत सुरु असलेल्या मेट्रो-३ च्या कामाबाबत

(२४) ९५५२६ (०१-०१-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मेट्रो - ३ च्या बांधकामादरम्यान फोर्ट परिसरातील जे एन पेटिट संस्था, सिद्धार्थ कॉलेज आणि इतर जुन्या व हेरिटेज वास्तूंना धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिध्दार्थ कॉलेजच्या सुमारे १२५ वर्षाच्या जून्या इमारतीला धक्के बसून कॉलेजच्या भिंतीला तडे गेल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, विटभट्टी, गोरेगाव (पूर्व) येथे दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मेट्रोचा खांब पडण्याची घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी सिध्दार्थ कॉलेजच्या कर्मचाऱ्यांनी दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी एमएमआरडीए आणि मुंबई मेट्रोकडे ऑनलाईन तक्रार अर्ज केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०३-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही

(३) मेट्रो मार्ग - ७ अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) च्या पॅकेज २ मधील आरे जंक्शन जवळील मेट्रो पीलर क्र. ५ चे कॉक्रीटकरण करण्यापुर्वीचे शटरींगचे काम क्रेनच्या सहाय्याने दिनांक २१ ऑक्टोबर, २०१७रोजी दुपारी ४.३० वाजता सुरु असताना लोखंडी सळयांचा सांगाडा वजनाने अलगदरित्या सर्व्हिस रोडच्या बाजूला झुकल्याची घटना घडली आहे.

(४) मा. मुख्यमंत्री महोदयांना सिध्दार्थ महाविद्यालयाच्या प्राचार्य व इतरांच्या सहयांचे दिनांक २७.९.२०१७ चे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(५) व (६) त्याअनुषंगाने मुंबई मेट्रो रेल महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी व सल्लागारांनी (General Consultant) सदर महाविद्यालयाच्या इमारतीची प्राचार्य, सिध्दार्थ महाविद्यालय यांचेसह संयुक्त पहाणी केली. मेट्रो लाईन ३ च्या कामामुळे सदर इमारतीस तडे गेले नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. मुंबई मेट्रो-७ प्रकल्पाच्या कामावर दिनांक २१ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या अपघात प्रकरणात सदर सांगाडा गॅस कटरने काढण्यात आला. सदर घटनेत कोणासही दुखापत झालेली नाही. सदर प्रकरणी हजगर्जीपणाबद्दल कंत्राटदारास कंत्राटाच्या शर्ती व नियमानुसार रु. ५ लाख दंड ठोठावला आहे.

मुंबई शहरातील कमाल जमीन नागरी कायदा सन १९७६ अंतर्गत कलम २० खाली विकसित झालेल्या जमिनी २००७ च्या कायद्यान्वये संरक्षित करण्याबाबत

(२५) ९६०७९ (०१-०१-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील कमाल जमीन नागरी कायदा, १९७६ अंतर्गत कलम २० खाली विकसित झालेल्या जमिनी सन २००७ च्या कायद्यान्वये संरक्षित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीच्या ७/१२ वर अद्यापपर्यंत शासनाचे नाव लागत असल्याने सदर जमिनीच्या विकासाकरिता अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००७ च्या कायद्यामध्ये ज्या जमिनी शैक्षणिक व वैद्यकीय प्रयोजनासाठी वापरण्यात येत आहेत त्यांना सूट देण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१८) : (१) व (२) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ मधील तरतूदीनुसार मुळ अधिनियमातील कलम २० अन्वये सुट देण्यात आलेल्या जमीनींना संरक्षण प्राप्त असल्याने अशा सूटीखालील क्षेत्राच्या अभिलेखामध्ये कलम २० अन्वये सूटीखालील क्षेत्र व हस्तांतरणास प्रतिबंध अशा प्रकारच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत.

तसेच नाजकधा कलम २० अन्वये सूट देण्यात आलेल्या जमीनीवर बांधकाम झालेल्या इमारतींचा पुनर्विकास करावयाचा असेल तर शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. सध्य:स्थितीत शासनस्तरावर याबाबत धोरण नसल्याने प्रस्तूत प्रकरणी सेवानिवृत्त न्यायमुर्ती श्री. बी.एन. श्रीकृष्ण व श्री. बी.एन. मखिजा (सेवानिवृत्त सचिव, भा.प्र.से.) यांची व्दिसदस्यीय समिती दि.१६/०६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली आहे.

(३) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ अन्वये ज्या जमिनी शैक्षणिक व वैद्यकीय प्रयोजनासाठी वापरण्यात येत आहेत, अशा जमीनींना पुन्हा सुट देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंब्रा (जि. ठाणे) येथील डायघर पोलिस स्टेशन हद्दीतील डावले गाव येथील गौसिया कंपाऊंड समोरील एम.डी. डेव्हलपर्सच्या जागेत स्फोटक पदार्थ दडवून ठेवल्याबाबत

(२६) ९६१५९ (०२-०१-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा (जि. ठाणे) येथील डायघर पोलिस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या डावले गाव येथील गौसिया कंपाऊंड समोरील एम.डी. डेव्हलपर्सच्या जागेत स्फोटक पदार्थ दडवून ठेवले असल्याची बाब दिनांक ५ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१८) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी करून शिळ डायघर पोलीस स्टेशन जि. ठाणे येथे गुरनं.३३/२०१७ भादंवि. कलम २८६, १२० (ब) सह भारताचा स्फोटक पदार्थ कायदा १९०८ चे कलम ४,५ प्रमाणे गुन्हा दाखल असून ३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. यातील एका आरोपीचे याप्रकरणी साक्षीदाराशी गाडी देण्या-घेण्यावरून वादविवाद होते. त्या कारणावरून सदर साक्षीदारास त्रास देण्याच्या उद्देशाने त्याच्या मालकी जागेमध्ये आरोपीने इतर साथीदारांच्या मदतीने उभ्या असलेल्या भंगार स्कॉर्पिओ गाडीमध्ये १) १० कि.ग्रॅ. पांढऱ्या रंगाचा अमोनियम नायट्रेट, २) दिड इंच लांबीचे एकुण ९ सुप्रिम डिटोनेटर प्रत्येकी ६ फुट लांब असलेल्या वायर सहीत लपवून ठेवल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सद्य:स्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ. नरेंद दाभोळकर यांच्या मारेकऱ्यांचा शोध घेण्याबाबत

(२७) ९६२५१ (०६-०१-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अंधश्रध्दा निर्मुलनाचे महत्त्वाचे कार्य करणारे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येला चार वर्षाहून अधिक कालावधी होऊन त्यांच्या मारेकऱ्यांचा शोध घेण्यास शासनाकडून जाणिवपूर्वक टाळाटाळ करण्यात येत असल्याचा संशय जनमानसात निर्माण होत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निष्क्रियेचा निषेध करण्यासाठी अंधश्रध्दा निर्मूलन समितीने राज्यभर 'जबाब दो' आंदोलन दिनांक २० ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मारेकऱ्यांचा तातडीने शोध घेण्याबाबत तसेच त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१८) : (१) हे खरे नाही.

दि.२०/८/२०१३ रोजी पुणे येथील बालगंधर्व रंगमंदीराच्या पाठीमागील ओंकारेश्वर पुलावर डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्यावर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. त्यासंदर्भात डेक्कन पोलीस स्टेशन (पुणे) येथे गु.र.नं.१५४/२०१३ भादंविकलम ३०२, ३४ शस्त्र अधिनियम ३/२५ अन्वये दोन अज्ञान इसमांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या खुनाचा तपास चालू असतांना दि.५/९/२०१३ रोजी श्री.केतन तिरोडकर यांनी सदर गुन्ह्याचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए)/केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग होणे कामी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.पीआयएल/४४/२०१३ (नवीन क्र.७/१४) नुसार मा.उच्च न्यायालयाने, सदर गुन्ह्याचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने करावा असा निकाल दिला आहे. त्याप्रमाणे गुन्ह्याचा तपास दि.२/६/२०१४ रोजी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्यात आला आहे व सदर गुन्ह्याचा तपास डी.वाय.एस.पी. सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टीगेशन, स्पेशल क्राईम ब्रँच, नवी मुंबई हे करीत आहेत.

(२) हे खरे आहे. राज्यात १७ ठिकाणी 'जबाब दो' आंदोलन करण्यात आले आहे.

(३) सदर गुन्ह्याचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्यात आला आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या हददीतील चुंचाळे येथील घरकुल योजनेसाठी विद्युत योजनेची कामे परवाना रद्द झालेल्या ठेकेदाराला देण्यात आल्याबाबत

(२८) ९६६८५ (०१-०१-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीतील चुंचाळे येथील घरकुल योजनेसाठी विद्युत योजनेची कामे परवाना रद्द झालेल्या ठेकेदाराला देण्याचा प्रकार माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्थायी समितीला अंधारात ठेऊन सदरचा ठेका देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे कंत्राटदारांना पाठीशी घालणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करण्यात येणार काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१८) : (१) चुंचाळे येथील घरकुल योजनेसाठी विद्युत योजनेच्या कामाबाबत निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन, संबंधित मक्तेदारास दि.०७.०९.२०१७ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहे.

मात्र, त्यांनतर मक्तेदारास दि.३१.१२.२०१७ पर्यंत 'अ' वर्गासाठी देण्यात आलेली मंजूरी पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दि.०४.०६.२०१५ पासून रद्दबादल करण्यात आली आहे.

(२) सदर कामास स्थायी समितीची वित्तीय मान्यता घेते वेळी, दि.०५.०७.२०१७ रोजी मक्तेदाराची कागदपत्रे वैध होती. तसेच, याबाबतचा तक्रार अर्ज महानगरपालिकेस दि.१०.१०.२०१७ रोजी प्राप्त झालेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिकमध्ये मालमत्ता नोंदणीसाठी १ टक्का सेस आकारला जात असल्याबाबत

(२९) ९६६८८ (३०-१२-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने एलबीटी रदद केल्यानंतरही नाशिकमध्ये मालमत्ता नोंदणीसाठी १ टक्का सेस आकारला जात असल्याची धक्कादायक बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एलबीटी सेस आकारत असलेल्या विभागांची राज्याचे अर्थराज्यमंत्री यांनी चौकशी सुरु करण्याचे आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुद्रांक कार्यालयाकडून वसुल करण्यात येणारा १ टक्का सेस मधील रक्कम नाशिक महानगरपालिकेला मिळणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०१८) : (१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चा ५९ चे कलम १२७ च्या पोट कलम (२) च्या खंड (कक्क) अन्वये नाशिक शहरामध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहराच्या हद्दीमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर आकारण्यात येत होता. शासन अधिसूचना दि.२०.०५.२०१३ अन्वये नाशिक महानगरपालिकेत मालमत्तेची खरेदी,विक्री किंवा देणगी याबाबतीत नोंदणी करण्यात येणाऱ्या दस्तांच्या वेळी १ टक्का अधिभार आकारला जातो व तो संबंधित महानगरपालिकेस देण्यात येतो.

(२) नाही.

(३) स्थानिक संस्था कर रद्द झाल्यानंतर सदर तरतूद सुरू ठेवण्याबाबत अधिनियम क्र ७ /२०१८ दि. १५.०१.२०१८ अन्वये राजपत्रात प्रसिध्द केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरात मेट्रो वाहतुक पदभरती प्रक्रीया सुरु झालेली असुन याकरीता जाहीरातीमध्ये अधिवासी प्रमाणपत्राची अट वगळण्यात आल्याबाबत

(३०) ९६७४९ (३०-१२-२०१७). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात मेट्रो वाहतुक सुरु होत असून याकरीता पदभरती प्रक्रीया सुरु झालेली असून जाहीरातीमध्ये अधिवासी प्रमाणपत्राची अट वगळण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्रातील सेवेकरीता ही पदभरती असल्यामुळे महाराष्ट्राचे अधिवासी प्रमाणपत्र असणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशाप्रकारे अट वगळण्यात आल्यामुळे महाराष्ट्राव्यतिरीक्त इतर राज्यातील लोंढा पदभरती करीता येवुन महाराष्ट्रातील बेरोजगारांवर अन्याय होणार, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जाहीरातीमधे अधिवासी प्रमाणपत्र तथा मराठी भाषा उत्तीर्ण असल्याची अट नमुद करण्याबाबत शासन दुरस्ती करणार आहे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा-मेट्रो) ही भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त सहभाग (५०:५०) असलेली विशेष हेतू वाहन (SPV) कंपनी आहे. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प सदर कंपनी मार्फत राबविण्यात येत आहे. सदर कंपनी भारत सरकारच्या नियमानुसार कार्यरत आहे. भारत सरकारच्या नियमानुसार विभिन्न पदांचे अर्ज करण्याकरीता उमेदवार हा भारतीय नागरीक असणे गरजेचे आहे, तसेच तो विशिष्ठ राज्याचा रहिवाशी असणे असे बंधन नाही. तथापि, नागपूर क्षेत्राची मागणी लक्षात घेता, अपर्यवेक्षीय (नॉन सुपरवायझरी) व पर्यवेक्षीय (सुपरवायझरी) पदाकरीता जी भरती करण्यात येणार आहे, त्यामध्ये मात्र महाराष्ट्र राज्यातील रहिवास आणि मराठी भाषेचे ज्ञान या दोन्ही गोष्टी अनिवार्य केलेल्या आहेत. पर्यवेक्षीय तथा अपर्यवेक्षीय पदाकरीता मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे. सदर पदाकरीता लेखी (ऑनलाईन) परिक्षा घेण्यात येणार असल्याने मराठी चाचणीत किमान उत्तीर्ण होणे आवश्यक अशी अट ठेवण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई व ठाणे शहराला जोडणाऱ्या कोपरी (ठाणे) येथील पुलाच्या कामाबाबत

(३१) ९६९०३ (०१-०१-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व ठाणे शहराला जोडणाऱ्या कोपरी (ठाणे) येथील पुलाच्या नव्या आराखड्यानुसार रुंदीकरणाच्या कामाची निविदा माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान प्रसिध्द झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामासाठी किती खर्च येणार आहे,
(३) तसेच सदरहू पुलाचे काम किती कालावधीत पूर्ण होणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१८) : (१) व (२) हे खरे आहे.

पूर्व द्रुतगती महामार्ग ठाणे शहरातून जाताना कोपरी जवळ मध्ये रेल्वे ओलांडत आहे. या ठिकाणी सध्या २+२ वाहिन्यांचा पूल अस्तिवात असून या पूलाचे रुंदीकरण करण्यासाठी विलंब होण्याची शक्यता असल्याने सदर पुलाच्या उंची बाबत रेल्वेशी झालेला संवाद तसेच प्रश्नाधीन पुलाच्या ठिकाणी असणाऱ्या रेल्वे मार्गिका, जलवाहीन्या विचारात घेऊन सदर पुलाचे दोन्ही बाजूंना रुंदीकरण करण्याचा दिनांक २७/०९/२०१७ रोजी निर्णय घेण्यात आला.

सदर प्रकल्पातील रेल्वे हद्दीतील पुलाचे काम रेल्वेमार्फत करण्यात येणार असून याकरीता आवश्यक निधी प्राधिकरणामार्फत रेल्वेला देण्यात येईल. तर रेल्वे हद्दीबाहेरील पुलाचे पोचमार्गाचे काम प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.

प्राधिकरणामार्फत करण्यात येणाऱ्या कामाकरीता दिनांक २७/०९/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या असून रेल्वेमार्फत करण्यात येणाऱ्या कामासाठी त्यांचेकडून दि ०७/११/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(३) रेल्वमार्फत रेल्वेच्या हद्दीतील काम निविदा स्वीकृत झाल्यानंतर ३० महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजित आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सदर काम हे प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाल्यापासून ३६ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

विदर्भातील अनेक बेरोजगांराना गुप्तचर विभागाचे बनावट नियुक्ती पत्र दिल्याबाबत

(३२) ९७०५९ (०६-०१-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात कुठलाही अर्ज भरलेला नसतांना विदर्भातील शेकडो बेरोजगार तरूणांना गुप्तचर विभागाचे नियुक्तीपत्र पाठवुन रूपये १५५०० भरा व नियुक्ती घ्या अशा आशयाचे बनावट नियुक्तीपत्र वाटप करणारी टोळी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. श्रीकृष्ण पुनिया व श्री. मनोजसिंग या व्यक्तींचा गृह विभागाने शोध घेतला आहे काय,

(३) असल्यास, गुप्तचर विभागाने सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने संबंधित आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०१८) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

याबाबत तक्रारी प्राप्त नाही तसेच गुन्हा सुध्दा नोंद नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात अतिकुपोषित बालक आढळल्याबाबत

(३३) ९७६८१ (०१-०१-२०१८). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात दिनांक २० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या दरम्यान अतिकुपोषित बालक आढळले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीअंती शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) सदर अतिकुपोषित बालकास उल्हासनगर महानगरपालिकेच्या मध्यवर्ती रुग्णालयात तपासून त्याचे प्राथमिक रोगनिदान करुन त्यावर तात्काळ औषधोपचार सुरु करण्यात आले.

दिनांक २१.०९.२०१७ रोजी सदर रुग्णास पुढील उपचारासाठी ठाणे येथील जनरल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

सद्य:स्थितीत सदर रुग्णाची प्रकृती चांगली असून, त्यास रुग्णालयातून घरी सोडण्यात आल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

साखरखेर्डा सह देऊळगावराजा (ता.सिंदखेडराजा जि.बुलडाणा) येथील दलालांनी शेतकऱ्यांची फसवणुक केल्याबाबत

(३४) ९८६५९ (०६-०१-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरखेर्डा सह देऊळगावराजा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलडाणा) येथील दलालांनी शेतात मोबाईल टॉवर उभारण्याचे व त्या ठिकाणी नोकरीचे आमिष देऊन डिपॉझिटच्या नावाखाली दीड लाख रूपयांची फसवणूक केल्याची घटना नुकतीच माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ७५ शेतकऱ्यांनी देऊळगावराजा पोलिस स्टेशनला तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांची फसवणूक करणा-या दलालांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) दि.२६/९/२०१७ रोजी एका फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन पो. स्टे. देऊळगावराजा येथे अप.क्र.३६०/१७ कलम ४२०, ४०६, ४६८, ४७१, ३४ भादंवि नुसार ४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) उपरोक्त गुन्ह्यात २ आरोपींना अटक केली आहे. १ आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर आहे व १ आरोपी फरार आहे.
गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) येथे चुकीच्या उपचाराने १६ वर्षाच्या तरुणीचा तापाने मृत्यू झाल्याबाबत

(३५) ९८६७४ (०१-०१-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे दिनांक १ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास चुकीच्या उपचाराने १६ वर्षाच्या तरुणीचा तापाने मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी उल्हासनगरातील झोपडपट्टीतील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी पालिका आयुक्तांकडे नगरसेवकांनी लेखी निवेदनाद्वारे दिनांक १ सप्टेंबर, २०१७ वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) उल्हासनगरमधील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी नगरसेवकांनी लेखी निवेदनाद्वारे केली ही वस्तुस्थिती आहे.
सदर मागणीनुसार उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली/येत आहे:-
• ४ बोगस डॉक्टरांची कागदपत्रे तपासून त्यांचेविरुध्द विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन येथे दिनांक १३.१०.२०१७ रोजी एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे.
• खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांची सर्व कागदपत्रे व नोंदणी (रजिस्ट्रेशन) तपासणी सर्व्हेक्षण कार्यक्रम सुरु आहे.

उरण तालुका (जि.रायगड) येथे सिडकोने आगरी, कोळी, कराडी लोकांची संस्कृती जपण्यासाठी कोळी भवन उभारण्याबाबत

(३६) ९८७८६ (०३-०१-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुका (जि.रायगड) व नवी मुंबई येथे ९५ गावांची शेतजमिन संपादित करून या संपादित जमिनीवर सिडकोने औद्योगिक वसाहतीसह मूळ गावठाण कायम ठेवीत नागरी वसाहती उभारल्या आहेत परंतू उरणमध्ये आरक्षित असणाऱ्या भूखंडावर सिडकोने आगरी, कोळी, कराडी लोकांची संस्कृती जपण्यासाठी कोळी भवन उभारण्याची मागणी तेथील ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१८) : (१) व (२) या विषयाबाबत उरण तालुक्यातील ग्रामस्थ अथवा लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

सिडकोने आगरी कोळी, कराडी लोकांची संस्कृती जपण्यासाठी नेरुळ येथे आगरी कोळी भवन उभारलेले असून रायगड जिल्हयात उलवे नोडमध्ये भूमीपुत्र भवन उभारण्यात येत आहे. तसेच, पागोटे, ता.उरण येथे हुतात्मा भवन बांधण्याकरिता ग्रामस्थांनी मागणी केली होती. सदर हुतात्मा भवनाकरिता निर्देशित करण्यात आलेल्या पागोटे गावाच्या परिसरातील होल्डींग पॉडजवळच्या जागेत कांदळवन तसेच जवळपास ८ मंदिरे असल्यामुळे हुतात्मा भवन उभारणे शक्य नव्हते. त्यामुळे सदर हुतात्मा भवन उरण तालुक्यात जासई येथे लवकरच उभारण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हयात नोकरीचे आमीष दाखवून अनेकांना फसविल्याबाबत

(३७) ९९०७७ (०६-०१-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात बारामती सहकारी बँकेत लिपीक पदावर कामावर नोकरी लावण्याचे आमीष दाखवून इंदापूर तालुक्यातील ७ लोकांना रूपये १९ लाखांनी फसविल्याचा प्रकार दिनांक २१ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबात इंदापूर पोलीस ठाण्यामध्ये तीन लोंकाविरोधात फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्हयात पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अनेक रिक्त जागांची भरती निघालेली असून तेथेही नोकरी देण्याचे आमीष अनेकांना दाखविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या दोन्ही प्रकरणाबाबत सखोल चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी एक फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २१/७/२०१७ पोलीस स्टेशन, इंदापूर येथे ३ लोकांविरोधात गु.र.नं. ४६८/१७ भादंवि कलम ४२०, ५०४, ३४ प्रमाणे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.

पुणे जिल्ह्यात पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अनेक रिक्त जागांची भरती माहे सप्टेंबर, २०१७ व माहे डिसेंबर, २०१७ मध्ये निघालेली आहे मात्र तेथे नोकरी देण्याचे आमीष दाखविल्याबाबत पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रात गुन्हा किंवा अर्ज दाखल नाही.
(४) व (५) जिल्ह्यात बारामती सहकारी बँके संदर्भातील गुन्ह्यात ९ साक्षीदार तपासण्यात आले. तीन्ही आरोपींना दि.२३/८/२०१७ रोजी अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे.
गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक (जि.नाशिक) येथील दादासाहेब फाळके स्मारकाच्या उद्यानाची झालेली दुरवस्था

(३८) ९९३५१ (३०-१२-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक (जि.नाशिक) येथील दादासाहेब फाळके स्मारकातील उद्यानातील खेळणी, पथदीप, कारंजे तसेच सभागृह, थिएटर इ.ची दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे येथील नागरिकांसह पर्यटकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या स्मारकाची दुरवस्था दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०१८) : (१) हे खरे नाही.

नाशिक येथील दादासाहेब फाळके स्मारकातील उद्यानातील सर्व स्थापत्य विषयक कामे, किरकोळ दुरुस्ती, रंगरंगोटी, खुर्च्या दुरुस्ती, गळती, मुख्य दरवाजे, गेट बसविणे,

विश्रामगृहाची दुरुस्ती, रंगमंचाची व प्रसाधनगृहांची दुरुस्ती, खेळणी दुरुस्ती इत्यादी कामे महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी केली जातात.

उद्यानातील संगित कारंजासाठी प्रोजेक्टर पुरविण्याचे काम खाजगी मक्तेदारामार्फत करुन घेण्यात येत असून, नविन एल.ई.डी. पथदिप बसविणेबाबत महानगरपालिकेमार्फत कार्यवाही प्रस्तावित आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात फाळके स्मारकाला सुमारे रु.४५ लक्ष इतके उत्पन्न प्राप्त झाले असून, रु.१५० लक्ष इतका खर्च झालेला आहे.

सदर स्मारकाचे व्यवस्थापन तोटा सहन करुन केले जात असल्याने, सदर स्मारक व परिसर सार्वजनिक खाजगी भागीदारी (Public Private Partnership) तत्वावर चालविण्यास देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथील बाजार समितीतील पाण्याचा टाकीत मृतदेह आढळून आला असल्याबाबत

(३९) ९९४१४ (०१-०१-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील बाजार समितीतील पाण्याचा टाकीत मृतदेह आढळून आला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेमुळे महानगरपालिकेच्या शहरात उपनगरात असलेल्या पाण्याच्या टाक्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणी आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलकुंभाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१८) : (१) होय.

नाशिक येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील पाण्याच्या टाकीमध्ये मृतदेह आढळून आला असून, या घटनेसंदर्भात फौजदारी गुन्हयाची नोंद पोलिस ठाण्यात करण्यात आलेली आहे.

(२) व (३) महानगरपालिकेच्या बहुतेक जलकुंभाच्या ठिकाणी व्हॉल्वमन क्वॉर्टर्स आहेत. तसेच काही ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्ह्यातील जिल्हा सैनिक अधिकाऱ्यांनी शहिदांच्या अंत्यसंस्कारास मदत दिली नसल्याबाबत

(४०) ९९४९३ (०१-०३-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील जिल्हा सैनिक अधिकारी दोन वर्षात शहिदांच्या अंत्यसंस्कारास उपस्थित राहिले नसून त्यांच्या अंत्यसंस्कारास देण्यात येणारी १० हजार रुपयांची मदतही देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर जिल्हा सैनिक अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०१-०३-२०१८) : (१), (२), व (३) उपरोक्त नमूद शहिद जवानांपैकी शिपाई संजू सुरेश खंडारे व शिपाई आनंद शत्रुघ्न गवई हे दोन जवान दिनांक २६ जानेवारी, २०१७ रोजी शहिद झाले होते व त्यांचा अंत्यविधी सोहळा एकाच दिवशी झाला. शिपाई आनंद शत्रुघ्न गवई या शहिद जवानाच्या अंत्यविधीसाठी तत्कालीन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अकोला श्री. चरडे हे स्वत: उपस्थित होते. तसेच शिपाई संजू सुरेश खंडारे या शहिद जवानाच्या अंत्यविधीसाठी सहाय्यक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, श्री. सुरेश प्रल्हाद खंदारे अकोला हे उपस्थित होते.

सैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्याकडून शहीद जवान १) शिपाई संजू सुरेश खंडारे, २) शिपाई आनंद शत्रुघ्न गवई, व ३) शिपाई सुमेध वामन गवई तसेच ४) दिवंगत जवान सुभेदार महेंद्र आकाराम खांडेकर या जवानांच्या कुटुंबियांना तातडीची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

नाहूर (प) भांडूप गाव येथे झालेले अनधिकृत बांधकाम

(४१) ९९६६४ (०१-०१-२०१८). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाहूर (प) भांडूप गाव म्हाडा कॉलनी, सुभाष नगर (अंजनीकुमार इस्टेट) येथील कृष्णा मोटर मारुती अधिकृत सर्विस सेंटर व्यवस्थापकाने आस्थापनेत मोठा प्रमाणात अनाधिकृत बांधकाम व आस्थापनेलगत महानगरपालिकेच्या रस्त्यावर रेलिंगचे बांधकाम करून अतिक्रमण केल्यामुळे येथील विद्यार्थी व जेष्ठ नागरिकांना रहदारीस तसेच वाहतूकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हरे कृष्णा फोर्ड मोटर या कंपनीनेही येथे अनाधिकृत बांधकाम करून महानगरपालिका अंतर्गत असलेल्या रस्त्यांवर अतिक्रमण केल्याचेही माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निर्देशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनीधींनी नागरीकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.आयुक्त, बृहमनमुंबई महानगरपालिका व मा.उपआयुक्त, बृहनमुंबई महानगरपालिका घाटकोपर परी-६ तसेच मा.सहाय्यक आयुक्त,एस विभाग यांना सदर कंपनींने केलेले अवैध बांधकाम व अतिक्रमण यावर कारवाई करणेबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची सद्यस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०२-२०१८) : (१), (२), (३), (४) व (५) हरे कृष्ण मोटर्स येथील अनधिकृत पोटमाळयाच्या बांधकामास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये दिनांक २६.०५.२०१६ रोजी नोटीस देण्यात आली.

सदर नोटीशीच्या उत्तरादाखल मालकाने सादर केलेल्या पुराव्याच्या छाननीनंतर दिनांक २२.११.२०१७ रोजी अंतिम आदेश पारित करण्यात आले आहेत.

सदर आदेशानुसार विहित कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

हरे कृष्ण मोटर्स येथील बाहेरील जागेत बांधण्यात आलेल्या अनधिकृत शेडला मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये दिनांक २७.०१.२०१७ रोजी नोटीस देऊन सदर अनधिकृत बांधकाम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आले आहे.

पालघर जिल्हयातील बोईसर ओद्योगिक वसाहतीतील मोहिनी ऑरगॅनिक्स या रासायनिक कंपनीला आग लागल्याबाबत

(४२) १०००१९ (०६-०१-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील बोईसर ओद्योगिक वसाहतीतील प्लॉट क्र. टी-७८ मधील मोहिनी ऑरगॅनिक्स या रासायनिक कंपनीमध्ये दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास भीषण आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त घटनेची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व भविष्यात सदरच्या घटना रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१३-०३-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २ ऑक्टोबर २०१७ रोजी सायंकाळी ०६.१० वाजता मोहिनी ऑरगॅनिक्स प्रा.लि. प्लॉट नं.टी-७७, ७८, ७९ व ७९ पार्ट, एमआयडीसी, तारापूर, बोईसर, जिल्हा पालघर या कारखान्यात आग लागली होती.

(२) होय.

दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी रात्री १०.०० वाजता सदर घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, संचालनालय, वसई यांचे मार्फत चौकशी करण्यात आली.

(३) चौकशी दरम्यान सदर कारखान्यात वापरण्यात येणा-या Thermic Fluid Heater मध्ये बिघाड होवून त्यामध्ये आग लागली व ती आग कारखान्यात इतरत्र पसरली असे आढळून आले. एका कामगारास ७ ते ८% भाजण्याच्या जखमा झाल्या. Thermic Fluid Heater मधील संरक्षक उपकरणे योग्य स्थितीत न ठेवल्याबद्दल कारखाना भोगवटादाराविरुध्द महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ चा नियम ७३ ZA चा खंड (vii) खंड (viii) आणि (ix) च्या भंगाबाबत एक, तसेच कारखान्यात काम करतेवेळी कामगारांना योग्य ती वैयक्तीक सुरक्षा साधने न दिल्याबद्ल कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत कलम ७A(२) (a) चा भंग आढळून आला व सदर नियमांच्या भंगाबाबत मा.न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात एक असे दोन खटले दाखल करण्यात आले आहेत.

औदयोगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, वसई या कार्यालयाने सखोल चौकशी अंती अशा घटनांची पुनरावृत्ती होवू नये याकरीता कारखाना व्यवस्थापनाला पुढील प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.:-

(१) Thermic Fluid Heater मधील संरक्षक उपकरणे योग्य स्थितीत ठेवावीत.

(२) Thermic Fluid Heater ची तपासणी सक्षम व्यक्तीकडून करुन घेण्यात यावी.

(३) कामगारांना योग्य ती वैयक्तीक सुरक्षा साधने पुरवावीत.

परंतु दिनांक ०२/१०/२०१७ रोजी सदर कारखान्यात आगीची घटना घडलेली होती, त्या घटनेत कारखान्यातील सयंत्रे इ.पूर्णपणे जळून या घटनेनंतर हा कारखाना अद्यापपर्यंत पुर्णत: बंद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

येरवडा कारागृहात कैद्यांमधील अंतर्गत वादामुळे हत्या होण्याच्या घटनांमध्ये होत असलेली वाढ

(४३) १००१५५ (१२-०२-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा कारागृहात कैद्यांमध्ये अंतर्गत भांडणे होवून त्याचे पर्यवसन हाणामारी, जीवघेणे हल्ले आणि खून होण्याच्या घटनांमध्ये होत असल्याची बाब माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारांमुळे अन्य कैदी व प्रशासनामध्ये चिंतेचे वातावरण तयार झाले असून कारागृहातील सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारांची गंभीर दखल घेत कारागृह प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१८) : (१) होय, येरवडा मध्यवर्ती कारागृह येथील शिक्षा बंदी दिनेश सुरेश दबडे व शिक्षा बंदी सुखदेव मेघराज मेहकारकर हे दोघेही स्वयंपाकगृहात एकत्रित काम करीत असताना अंगावर पाणी पडल्याच्या किरकोळ कारणावरुन पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन दि. ०८.०७.२०१७ रोजी शिक्षा बंदी-दिनेश सुरेश दबडे याने बी यार्ड मधील विभक्त कोठडी क्र. ५ मधील शिक्षा बंदी सुखदेव मेघराज मेहकारकर याच्या डोक्यात दगड घालून खून केला आहे.
(२) शिक्षा बंदी दिनेश सुरेश दबडे याने किरकोळ कारणास्तव शिक्षा बंदी सुखदेव मेघराज मेहकारकर याचा खून केल्याची घटना ही दोन बंद्यापूरती मर्यादित असून, त्यामुळे बंदी व प्रशासनामध्ये कोणतेही चिंतेचे वातावरण नाही. तसेच कारागृहाची सुरक्षा व्यवस्था अबाधित आहे.
(३) नमूद घटनेतील शिक्षाबंदी दिनेश सुरेश दबडे यांचे विरुध्द गु.र.नं. ५४७/१७ भा.द.वि. कलम ३०२ अन्वये येरवडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरु असून दि. ०४.०८.२०१७ रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे सुरक्षेच्या कारणास्तव वर्ग करण्यात आले आहे. तसेच नमूद घटनेसंबंधीत कर्तव्यावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

संजय दत्तची सुटका शिक्षेचा कालावधी पूर्ण होण्याआधीच करण्यात आल्याबाबत

(४४) १००१६८ (१२-०२-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संजय दत्तची सुटका शिक्षेचा कालावधी पूर्ण होण्याआधीच करण्यात आल्याची गंभीर बाब माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकारास पुण्यातील नागरिकाने मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले असता न्यायालयाने संजय दत्त लवकर सुटलाच कसा याचे उत्तर दोन आठवड्यांत द्या असे सरकारला बजावले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गंभीर गुन्ह्यातील शिक्षा भोगत असलेल्या आरोपींच्या संदर्भात असलेले निकष डावलून शिक्षेचा कालावधी पूर्ण होण्याआधी त्याची सुटका करणाऱ्या संबंधित कारागृह प्रशासनाविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१८) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही, परंतु नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहातून मुक्त झालेल्या एका बंदयाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका (PIL) क्र. ९/२०१६ मध्ये सरकारने आपली बाजू मांडावी असे आदेशीत केले होते. सदर जनहित याचिका (PIL) क्र.९/२०१६ मा. उच्च न्यायालयाने दि. ०१.०२.२०१८ रोजी फेटाळली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद येथे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे स्मारक उभारण्याबाबत

(४५) १००३५२ (०६-०१-२०१८). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे स्मारक उभारण्याच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्मारक उभारणीचे काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(३) असल्यास, सदर स्मारक उभारण्याबाबत शासनाने अद्यापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१८) : (१), (२) व (३) स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे औरंगाबाद येथे स्मारक उभारण्याचा शासनाने निर्णय घेतलेला असून हे स्मारक उभारण्यासाठी शहर व औदयोगिक विकास महामंडळ (सिडको) ही मुख्य कार्यान्वयीन यंत्रणा ठरविण्यात आलेली आहे.

सदर स्मारक उभारणीसाठी मा.मंत्री(महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली असून, जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती गठित करण्यात आलेली आहे.

सदर कामाकरिता राज्यशासन व सिडको यांच्यामधील सामंजस्य कराराचा मसुदा शासनास प्राप्त झालेला असून सदर मसुदा तपासून घेण्याकरिता जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जालना जिल्ह्यामध्ये ५५५ शस्त्र परवानाधारक असून त्यांच्या वर्गीकरणाची अद्ययावत संख्येची नोंद गृह विभागाकडे नसल्याबाबत

(४६) १००५४४ (०६-०१-२०१८). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यामध्ये ५५५ शस्त्र परवानाधारक असून गृह विभागामार्फत शस्त्र परवाना देण्यात आलेला आहे यामध्ये बोरींग व पिस्तुलांचा समावेश आहे मात्र यांच्या वर्गीकरणाची अद्ययावत संख्या गृह विभागाकडे नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१८) : (१), (२) व (३) जालना जिल्ह्यामध्ये केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार दि. ३१/०३/२०१७ पुर्वी कार्यरत असलेल्या (५५५) शस्त्र परवाना धारकांची माहिती नॅशनल डेटाबेस फॉर आर्म्स लायसन्स (NDAL) या प्रणालीमध्ये भरण्यात आलेली आहे. त्यामध्ये शस्त्राचा प्रकार व इतर माहिती समाविष्ट आहे. तसेच जालना दंडाधिकारी कार्यालयातील नोंदवही मध्ये शस्त्र परवानाधारकांच्या शस्त्रांच्या नोंदी अद्यावत ठेवण्यात आलेल्या आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात कचरा उचलणाऱ्या कोणार्क कंपनीने महानगरपालिकेचा महसुल बुडविल्याबाबत

(४७) १०१२२५ (०१-०१-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात कचरा उचलणाऱ्या कोणार्क कंपनीने नियमबाहय पध्दतीने महानगरपालिका मैदाने वापरून महानगरपालिकेचा महसुल बुडविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीचा ठेका रद्द करणेकरिता महानगरपालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त कंपनीवर तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने महानगरपालिका प्रशासनास कोणते तातडीचे आदेश दिले आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१८) : (१), (२), (३) व (४) उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत मे. कोणार्क एन्व्हायरो प्रोजेक्ट प्रा.लि. यांना घनकचरा वाहतुकीसाठी दिनांक २५.०३.२०१३ रोजी करारबध्द केले आहे.

सदर कंपनीमार्फत वाहन पार्किंग व कार्यालयासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेचे मे-२०१७ पर्यंतचे रु.५.४० कोटी इतके थकीत भाडे भरण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत नोटीस बजावण्यात आली होती.

तथापि, सदर प्रकरणी मे. कोणार्क एन्व्हायरो प्रोजेक्ट प्रा.लि. यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे क्रमांक ५६१७/२०१७ अन्वये याचिका दाखल केली असून, माहे ऑगस्ट, २०१७ रोजीच्या आदेशान्वये, सदर कंपनीकडून भाडेवसुलीस स्थगिती दिली आहे.

सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ असून, उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

मौजा गोधनी (रेल्वे) येथील खसरा क्र. ४२६, ४२७/१ आणि ४२८ या जमिनीचे महाराष्ट्र गृहनिर्माण प्राधिकरणाकडून (म्हाडा) बळजबरीने होत असलेल्या संपादनाबाबत

(४८) १०१२५१ (३०-१२-२०१७). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा गोधनी (रेल्वे) प.ह.न. १२ (ता.जि.नागपूर) येथील खसरा क्र. ४२६, ४२७/१ आणि ४२८ या जमिनीचे महाराष्ट्र गृहनिर्माण प्राधिकरणाकडून (म्हाडा) बळजबरीने होत असलेल्या संपादनाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास अध्यक्ष, म्हाडा यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१३-०३-२०१८) : (१) होय.

(२) व (३) नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या ताब्यात असलेली सदर जमीन परत मिळण्याबाबत श्री.होले यांच्या वारसदारांनी नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या विरुध्द सहावे सह दिवाणी न्यायाधीश, नागपूर यांचे न्यायालयात दिवाणी दावा क्र.६८०/२०१७ दाखल केला असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

सदरची वस्तुस्थिती स्थानिक लोकप्रतिनिधींना मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.

देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांचे वीज मोटारपंप चोरी करणाऱ्या टोळीला पकडल्याबाबत

(४९) १०१६०२ (०६-०१-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांचे वीज मोटारपंप चोरी करणाऱ्या टोळीला माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अटक करण्यात आलेल्या टोळीकडुन किती माल जप्त करण्यात आला आहे,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०१८) : (१) हे खरे आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे.अंढेरा येथे दाखल अप क्र.३४५/१७ क.३७९ भादंवि गुन्हयात दि.३/११/२०१७ रोजी पाच आरोपींना अटक करण्यात आली.

(२), (३) व (४) आरोपींकडून चॅप्टर केस क्र.१/१७ क ४१ (१) (४) सीआरपीसी च्या कारवाईमध्ये २७ नग इलेक्ट्रीक मोटार पंप व ०९ स्प्रींकलर सेट स्टॅण्ड, असा अंदाजे किंमत ३,३३,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच, सखोल चौकशी केली असता, पो.स्टे. देऊळगांव राजा येथे दि.३/११/२०१७ रोजी देऊळगांव मही येथील बंद असलेल्या शेतातील गोडावून मध्ये २ नग ३ एचपी च्या इलेक्ट्रीक मो.पंप असा एकूण कि.५०,०००/ रुपयाचा माल चोरुन नेल्याप्रकरणी पोलीस स्टेशन देऊळगांवराजा येथे अज्ञात आरोपींविरुध्द दाखल असलेला अप.क्र.३२४/१७ कलम ४६१, ३८० भादंवि च्या गुन्ह्यातील मुद्देमाल सुध्दा चोरुन नेल्याची कबुली दिली आहे. उपरोक्त दोन्ही गुन्हे पोलीस तपासावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेला (जि.औरंगाबाद) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत मिळालेला निधी परत जाणार असल्याबाबत

(५०) १०२७१७ (०३-०१-२०१८). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेला (जि.औरंगाबाद) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत ८ कोटी रूपयांचा निधी सन २०१४ मध्ये मिळाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निधीचा अद्यापपर्यंत कोणताही विनियोग करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या निक्रिय धोरणामुळे हा निधी परत जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१८) : (१) व (२) राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत शहर आरोग्य समिती, औरंगाबाद महानगरपालिका यांना सन २०१४-२०१५ मध्ये रु.१,४१,४७,०००/- इतका निधी प्राप्त झालेला असून त्यापैकी रु.९२,२२,०००/- इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे. उर्वरित शिल्लक रक्कम ४९,२४,०००/ सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.